# गोदरेज सिक्युरिटी सोल्यूशन्सचे 'यूव्ही केस'

**मुंबई** : भविष्यकालीन स्वरूपाची सुरक्षाविषयक उत्पादने बनवणाऱ्या गोदरेज सिक्युरिटी सोल्यूशन्स या आघाडीच्या ब्रँडने 'कोविड'पासून संरक्षण मिळवून देणारी यंत्रणा सादर करून आरोग्य सुरक्षा क्षेत्रात प्रवेश केला आहे. आरोग्य सुरक्षाविषयक उत्पादनांना असलेली मोठी मागणी लक्षात घेऊन गोदरेजने 'यूव्ही केस' हे उत्पादन सादर केले व आपल्या आरोग्य सुरक्षा विभागाचा विस्तार केला. दररोजच्या वापरातील वस्तू, उपकरणे व आवारात प्रवेश करताना अनेक जणांचा स्पर्श होणारे पृष्ठभाग यांचे निर्जंतुकीकरण करण्यासाठी हे उपकरण वापरण्यात येते. गोदरेज सिक्युरिटी सोल्यूशन्सकडून नव्याने सादर करण्यात आलेल्या यूव्ही केसमध्ये यूव्ही-सी लाईट निर्जंतुकीकरण तंत्रज्ञान वापरण्यात आले आहे. निर्जंतुकीकरणाची माहिती व अनुभवजन्य पुराव्यांच्या आधारावर विषाणू व जंतूंचा फैलाव रोखण्यासाठी अनेक स्वरूपाचे प्रतिबंध निर्माण करणारे हे उपकरण आहे. सार्स-कोव-१ यासह अन्य विषाणू व जीवाणू यांच्या ६५हून अधिक जातीचा नायनाट करण्यासाठी जगभरात सर्वात जास्त वापरली जाणारी यूव्ही-सी निर्जंतुकीकरण ही वैज्ञानिक पद्धत आहे.